चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
०४ जानेवारी, २०२०
☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: 7447744100 (PRO)

# गुप्तधन आणि पैश्यापोटी साधुंनी घेतला एका इसमांचा जिव आरोपीस जन्मठेपेची शिक्षा

पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर अंतर्गत फिर्यादीच्या वडीलांना जिवानिशी ठार करणाऱ्या आरोपीस ०३/०१/२०२० रोजी **श्री. पि.जे मोडक, सत्र न्यायाधीश चंद्रपुर यांनी जन्मठेपेची** शिक्षा ठोठावली.

पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर अंतर्गत यातील फिर्यादीचे वडील यांनी आपल्या घरी पुजापाठ करण्यासाठी दोन साधुंना बोलाविले होते. ते रोज रात्रीला त्यांचे घरी पुजापाठ करीत होते. दिनांक १३/१२/२००१ रोजी फिर्यादीच्या घरी आणखी एक साधु आला आणि रात्रो दरम्यान पुजापाठ करीत असतांना पुर्वीचे दोन साधु यांचेशी संगणमत करून गुप्तधन आणि घरातील पैसे चोरी करण्याच्या उद्देशाने फिर्यादीच्या वडीलांस जिवानिशी ठार केले. अशा फिर्यादीच्या रिपोटवरून पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर येथे अप.क्र. २५३/२००१ कलम ३०२, ३८२ भांदवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपासादरम्यान तत्कालीन पोलीस निरिक्षक श्री. तिळके, पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर, यांनी गुन्हयातील आरोपी नामे किसन दादाराव मोरे वय ४८ रा. किनगाव, ता. नांदेळ आणि इतर तिन आरोपीस अटक करून आरोपींविरूद्ध सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक ३०/०९/२०१९ रोजी **आरोपी नामे किसन दादाराव मोरे वय ४८ रा. किनगाव, ता. नांदेळ** यास **कलम ३०२ भादंवि मध्ये जन्मठेपेची शिक्षा व ५,०००/—रू दंड, न भरल्यास ६ महिने शिक्षा, कलम ३८२ भादंवि मध्ये ५ वर्षाची शिक्षा व २,५००/—रू दंड, न भरल्यास ३ महिन्याची शिक्षा श्री. पि.जे मोडक, सत्र न्यायाधीश चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **ॲड. ए.एस. शेख, सरकारी अभियोक्ता, चंद्रपूर** आणि कोर्ट पैरवी म्हणुन सफौ. वामन मेश्राम, पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर यांनी काम पाहिले.

———————————————————————————————

# एस.जे.एस.व्ही लॅण्ड डेव्हलपर्स इंडीया लिमीटेड चंद्रपुर मध्ये गुंतवणुक करणाऱ्या ग्राहकांना चंद्रपुर पोलीसांतर्फे सुचना

चंद्रपुर जिल्हयात एस.जे.एस.व्ही लॅण्ड डेव्हलपर्स इंडीया लिमीटेड चंद्रपुर मध्ये ग्राहकांची फसवणुक झाल्याबाबत फिर्यादी नामे सुनिल नामदेव नैताम वय ३५ रा. चामोर्शि जि. गडचिरोली यांनी पोलीस स्टेशन चंद्रपुर शहर येथे अप.क्र. १५६०/२०१७ कलम ४०६,४०९, ४२०,३४ भादंवि सहकलम ३ एमपीआयडी ॲक्ट १९९९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास हा मा. पोलीस अधीक्षक चंद्रपुर डॉ. श्री. महेश्वर रेडड्ी यांचे मार्गदर्शनात आर्थिक गुन्हे शाखा चंद्रपुर यांचे कडे सोपाविण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा उलगडा लावण्यासाठी पुरावा गोळा करण्यासाठी आणि पुढिल तपासाकरीता ज्या गुंतवणुकदारांनी या संस्थेत गुंतवणुक केली आहे त्यांनी त्यांचे सर्टिफिकेट आर्थिक गुन्हे शाखा चंद्रपर येथे तात्काळ जमा करावे. याची सर्व गुंतवणुकदारांनी नोंद घ्यावी. संपर्काकरीता आर्थीक गुन्हे शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपुर येथे संपर्क साधावा.

संपर्क क्रमांक **07172-273258**

---